


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ००३ ● पुणे ● शुक्रवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



पर्वतीमध्ये "आबा" पॅटर्नची जोरदार चर्चा 3



धायरी व भागातून महाविकास आघाडीला... 4

## ठळक बातम्या

### मोटारीचा 'जॅमर' काढण्यासाठी मागितली लाच

**पुणे : (आरंभ पर्व) :** नो पार्किंगमध्ये लावलेल्या मोटारीच्या चाकाला लावलेला जॅमर काढण्यासाठी एक हजारांची लाच मागणाऱ्या वाहतूक शाखेतील वॉर्डनसह हायक फौजदाराविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघेही समर्थ वाहतूक विभागात कार्यरत आहेत. सहायक पोलीस फौजदार किरण दत्तात्रय रोटे (वय 51), ट्रॅफिक वॉर्डन अनिस कासम आगा (वय 48, रा. कोंढवा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत एका मोटरचालकाने फिर्याद दिली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ही कारवाई केली.

### पिंपरी-चिंचवडमध्ये 80 लाखांची रोकड

**पिंपरी : (आरंभ पर्व) :** विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवैधरीत्या वाहतूक करीत असलेली 79 लाख 66 हजाराची रोकड जप्त केली आहे. तसेच 78 लाखांचा दारूसाठा, 16 लाखांचा गांजा, 17 लाखांचे अमली पदार्थ (मेफेड्रोन) जप्त करण्यात आले आहे. तसेच 1438 जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. विधानसभा निवडणूक शांततेत व सुरळीत पार पडावी, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस प्रयत्न करत आहेत. प्रतिबंधात्मक कारवाईसह पोलीस संचलन, नाकाबंदी करण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकारी हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

# 'पूर्व' आणि 'पश्चिम' पुण्याचा वाद जुनाच

**कोथरूड, शिवाजीनगर, पर्वती, कसबा, खडकवासला, पुणे कॅन्टोन्मेंट या मतदारसंघांवर पुन्हा वर्चस्व प्रस्थापित करण्याचे भाजपपुढे आव्हान असणार आहे. भाजपला या ठिकाणी यश मिळाल्यास पुण्याचे नेतृत्व हे भाजपच्या ताब्यात राहणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पुण्याचे नेतृत्व पूर्व पुण्याच्या की पश्चिम पुण्याच्या हाती, हा प्रश्न निकाली लागणार आहे. मात्र, पूर्व पुणे आणि पश्चिम पुणे हा परंपरेने चालत असलेला वाद कायम राहणार आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात काही वाद हे पूर्वीपासून चालत आले आहेत. त्यांपैकी 'पूर्व पुणे' आणि 'पश्चिम पुणे' हा वाद तर अगदी जुनाच. पश्चिम पुण्याचे पुढारी पूर्व पुण्याकडे दुर्लक्ष करत असल्याने कोणतीही नवीन योजना आली, की पहिल्यांदा ती पश्चिमेकडे राबवली जाते. त्यामुळे पूर्व पुण्याच्या विकासाला बाधा येत असल्याचा आरोप कायम केला जातो. आता मोठ्या प्रमाणात विकसित होत असलेला पूर्व भाग आणि त्यातून उदयाला येणाऱ्या नवीन नेतृत्वामुळे कोणत्या भागाचे नेतृत्व वरचढ, हा प्रश्न उभा राहिला आहे. विधानसभा निवडणुकीत पूर्व पुणे कोणाला साथ देणार, यावर पुण्याचे नेतृत्व कोणाच्या हाती जाणार, हे स्पष्ट होणार आहे.



पुण्यात पूर्व पुणे आणि पश्चिम पुणे हा वाद परंपरेने कायम सुरू असतो. नगरपालिका असल्यापासून हा वाद कायम चर्चेत राहिला आहे. पश्चिमेकडे शिक्षणसंस्था, नगर नियोजन योजना आणि चकाचक रस्ते; पण पूर्वेकडे या सुविधांचा अभाव असल्याची नाराजी पूर्व भागातील राजकीय नेते कायम व्यक्त करत आले आहेत. पश्चिमेकडे सुविधाच सुविधा, तर पूर्व भागात नागझरी नाला. त्याची स्थिती त्या वेळी दयनीय होती. त्यामुळे या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले असायचे. मात्र, या भागात ससून हॉस्पिटल, के. ई. एम. हॉस्पिटल, ताराचंद हॉस्पिटल ही पूर्वीपासून आहेत. तत्कालीन नगरपालिकेचे बरेचसे दवाखानेही पूर्व भागामध्येच होते. व्यापारी पेठा पूर्वेकडे होत्या. राजकीयदृष्ट्या नगरपालिकेतील निम्मे सभासद पूर्व भागातून निवडून येत असत. त्या दृष्टीने त्यांचे नगरपालिकेत बहुमत असले, तरी त्यांच्यात एकमत होत नसे. त्यामुळे पूर्व भागात कोणतीही योजना लवकर येत नसल्याने हा भाग विकासापासून पश्चिम भागाच्या तुलनेत मागे पडला.

पुणे महापालिका स्थापन झाल्यावरही हे चित्र बदललेले दिसत नाही. पूर्व पुणे आणि पश्चिम पुणे हा वादाचा विषय सुरूच राहिला. महापालिकेत कोणतीही नवीन योजना आली, की त्यावरून पूर्व पुण्याचे नगरसेवक आक्रमक होताना आजही दिसतात. विशेषत: पाण्याचा विषय निघाला, की पूर्व पुण्याचे नगरसेवक हे या विषयावर का होईना एकत्र येऊन या प्रश्नाकडे लक्ष वेधत आले आहेत.

पुण्याच्या पूर्व भागात हडपसर, वडगाव शेरी, तसेच पुणे कॅन्टोन्मेट मतदारसंघाचा काही भाग येतो. अन्य मतदारसंघ हे पुण्याच्या पश्चिमेकडील भागाशी संलग्न समजले जातात. पूर्व भागातील हडपसर आणि वडगाव शेरी हे मतदारसंघ उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्राबल्य असणारे आहेत, तर पश्चिमेकडील मतदार हे भाजपचे नेतृत्व मानणारे आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर पुण्यावर पूर्व भागाचे वर्चस्व राहणार, की पश्चिमेच्या हातात परंपरेने नेतृत्वाची धुरा कायम राहणार, हे स्पष्ट करणारी ही निवडणूक असणार आहे.

पुण्याच्या पूर्व भागातील गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर हा परिसर झपाट्याने विकसित झाला आहे. साडेसतरा नळी, मुंढवा, केशवनगर, महंमदवाडी, वडगाव शेरी, विश्रांतवाडी या भागाचा कायापालट झाल्याने विकासाबाबतीत पूर्व आणि पश्चिम पुण्यातील असमतोल कमी करण्याचा प्रयत्न झाला आहे. मात्र, या भागावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व राहिले आहे. सध्या हडपसर आणि वडगाव शेरी या दोन्ही विधानसभा मतदारसंघांत रार्ष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे अनुक्रमे चेतन तुपे आणि सुनील टिंगरे हे आमदार आहेत. या निवडणुकीत दोन्ही जागा राखण्याचे आव्हान अजित पवार यांच्यापुढे आहे.

# डंपरच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या तरुणीचा मृत्यू

## 23 दिवसांची मृत्यूशी झुंज ठरली अपयशी

**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

वाघोलीत डंपरच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या तरुणीचा अखेर रविवारी (दि. 3) मृत्यू झाला. तिने 23 दिवस मृत्यूशी झुंज दिली. तिच्या मृत्यूनंतर डंपर चालकावर गुन्ह्याचे कलम वाढविण्यात आले आहे. मनीषा बाळासाहेब मंडलिक (वय 23, रा. वाघोली) असे मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव आहे. 10 ऑक्टोबर रोजी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास वाघोलीत पुणे-नगर महामार्ग ओलांडत असताना छत्रपती शिवाजी महाराज





पुतळ्याजवळ डंपरने मनिषाला धडक दिली होती. तेथून जाणारे आमदार अशोक पवार यांनी तत्काळ तिला रुग्णालयात दाखल करून नंतर पुण्यातील खाजगी रुग्णालयात तिची उपचाराची सोय केली होती.

तिचे दोन्ही पाय डंपर खाली आल्याने ती गंभीर जखमी झाली होती. 23 दिवसांची तिची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.

ती खासगी नोकरीला होती. तसेच कुटुंबासाठी आधार होती. डंपर चालक अनिल शंकर तुरुकमारे (वय 38 वर्षे रा. तितिक्षा पार्क, आळंदी फाटा, लोणीकंद) याच्यावर दुसऱ्या दिवशी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तिच्या मृत्यूनंतर चालकावर गुन्ह्याचे कलम वाढविण्यात आले असल्याची माहिती वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाड यांनी दिली.




# कट्टर विरोधक झाला मित्र

## जगदीश मुळीक महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या प्रचारात सक्रिय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत चर्चेत असलेले भाजपचे माजी आमदार आणि माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुळीक यांची भेट घेऊन त्यांना आमदारकीचा शब्द दिला. त्यामुळे मुळीक नाराजी दूर ठेवून महायुतीचे उमेदवार टिंगरे यांच्या प्रचाराला लागले आहेत. पुणे शहरातील वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ गेल्या काही काळापासून चर्चेत आहे. महायुतीतील जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या वाट्याला आला. या मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे सुनील टिंगरे विद्यमान आमदार असल्याने तेच विधानसभा निवडणूक लढविणार, हे जवळपास निश्चित झाले होते. मात्र, भाजपचे माजी आमदार आणि माजी



शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी त्याला विरोध केला. हा मतदारसंघ भाजपने आपल्याकडे घ्यावा, यासाठी मुळीक विशेष प्रयत्नशील होते. या मतदारसंघाचा आढावा घेण्याची जबाबदारी भाजपने आमदार पंकजा मुंडे यांच्यावर दिली होती. मुंडे यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत या भागातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी, 'मुळीक उमेदवार नसतील, तर महायुतीचे काम करणार नाही,' असा थेट इशाराच दिला होता. उमेदवारी भरण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत टिंगरे आणि मुळीक दोघांकडेही पक्षाने दिलेले 'एबी' फॉर्म होते. अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी आपल्या कार्यकर्त्यांना घेऊन मुळीक यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय गाठले होते. अर्ज भरण्यासाठी शेवटची काही मिनिटे बाकी असताना फडणवीस यांनी त्यांना फोन करून अर्ज दाखल न करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल न करता मुळीक घरी परतले. त्यांचे कार्यकर्ते आणि वडगाव शेरीमधील भाजप पदाधिकारी यावर नाराज होते. मुळीक यांना उमेदवारी न दिल्याने टिंगरे यांचा प्रचार न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता.

दरम्यान, दिवाळीच्या काळात फडणवीस यांनी पुण्यात येऊन सर्व नाराज पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. मुळीक यांच्या घरी जाऊनदेखील फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन नाराजी दूर केली. 'पक्षाच्या वतीने तुम्हाला विधान परिषदेची आमदारकी दिली जाईल,' असा शब्द फडणवीस यांनी मुळीक यांना दिला. हा 'शब्द' मिळाल्याने मुळीक यांची नाराजी दूर झाली.

### नाराजी दूर

प्रचारात सहभाग वडगाव शेरी मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या प्रचाराचा नारळ जगदीश मुळीक यांच्या उपस्थितीत फोडण्यात आला. 'वडगाव शेरीला टिंगरे यांच्या रूपाने विधानसभेत एक आमदार मिळणार आहे. तसेच, मीसुद्धा विधान परिषदेवर जाणार आहे. त्यामुळे वडगाव शेरीला दोन आमदार मिळणार असून, या मतदारसंघाला विकासाच्या उंचीवर नेऊ,' असा विश्वास मुळीक यांनी या वेळी व्यक्त केला.





# आचारसंहितेचे पालन करताना...

मनोज सुमन शिवाजी सानप

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच ‘आचारसंहिता’ म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी ‘काय करावे’ आणि ‘काय करू नये’ याबाबत काही महत्त्वाची तत्त्वे सांगितलेली आहेत.

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरु ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररीत्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.



निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष/शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम/निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खासगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारूचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून 100 मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या 48 तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये. आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील ॲपवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# सादर करते 'यस टू फ्रेश'-चव, मजा आणि ताज्या दृष्टीकोनाचा उत्सव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

परफेटी व्हॅन मेल इंडिया घराण्यातील मेंटोस, एक विश्रांतीनंतर टेलिव्हिजन स्क्रीन्सवर रंगीबेरंगी प्रक्षेपण करत आहे - 'यस टू फ्रेश' ही नवीन प्रचार मोहीम जाहीर करत आहे, जी सामान्य, नीरस क्षणांना मेंटोसच्या ताज्या चवींच्या साहाय्याने असामान्य अनुभवांमध्ये रूपांतरित करण्याचा आनंद साजरा करते.

या प्रचार मोहिमेत अभिनेता अभय वर्मा सहभागी असून, ती प्रत्येक क्षणात मेंटोस ज्या ताज्या, खेळकर ऊर्जा आणते, त्याचे सुंदर वर्णन करते. ब्रँड फिल्म मागील कल्पना अशी आहे की मेंटोस कँडी खाणे म्हणजे फक्त मजा करणे आणि खेळाला ताजेपणा आणि सर्जनशील दृष्टीकोन देणे, जे 'यस टू फ्रेश' या संकल्पनेशी परफेक्टपणे जुळते सुद्धा.

या फिल्मची सुरुवात एका नीरस बायोलॉजी (जीवशास्त्र) च्या क्लास रुम होते, जिथे दिसून येते की विद्यार्थी खूप कंटाळलेले आहेत, उबगलेले आहेत आणि गहिऱ्या विचारांत बिनधास्तपणे हलत आहेत. अभय वर्मा, मुख्य पात्र, कंटाळ्यामुळे मेंटोस कँडी घेतो आणि तोंडात टाकतो, आणि त्वरित त्याच्यावर ताजेपणाची लाट येते, जी उत्साही संगीताने आणि वातावरणात अचानक बदलून दर्शवली जाते.

नीरस असलेल्या क्लास रुम मध्ये अभयच्या मनात रंगांची भरभराट होऊ लागते. त्याचे कपडे रंगांनी फुलतात, भिंती उघडतात, बेंचेस फिरतात, आणि एक विचित्र गोंधळ सुरु होतो, तरीही त्याचे निरागस सहकारी विद्यार्थी त्यापासून




अप्रभावित राहतात, ज्यामुळे या दृश्यांना हास्याचा एक स्पर्श मिळतो. एक विद्यार्थी अचानक जागा होतो, कागद हवेत उडतात, एक शारीरिक रचनाविषयक पुस्तक एका मुलीच्या चेहऱ्यावर मजेदार पद्धतीने आदळते, आणि प्राध्यापकांची विग हवेत उडते, ज्यामुळे नृत्य करणारी कंकाल दिसते. मजा आपल्या उच्चांकावर पोहोचते, जेव्हा अभय दुसरे मेंटोस घेतो, आणि ऊर्जा पुन्हा सुरू होते, आणि क्लास रुम अनियंत्रित उत्साहाने फिरायला लागते, शेवटी प्रसिद्ध मेंटोस लोगोने समारोप होतो, जो सांगतो की मेंटोस कसे नीरस आणि कंटाळवाण्या क्षणांना मजेदार अनुभवांमध्ये रूपांतरित करू शकते.

परफेटी व्हॅन मेल इंडियाचे मार्केटिंग डायरेक्टर गुंजन खेतेन म्हणतात, "मेंटोस अनेक वर्षांपासून ताजेपणा आणि नव्या दृष्टीकोणाशी संबंधित आहे, ज्यामुळे ते प्रत्येक ठिकाणी ग्राहकांवर दीर्घकालीन प्रभाव टाकत आहे. आमच्या नवीन प्रचार मोहिमेचा 'यस टू फ्रेश' हा संदेश या परंपरेला मानाचा मुजरा अर्पण करतो आणि जनरेशन झेडसाठी एक ताजे दृष्टीकोन सादर करतो. या रंगीबेरंगी पिढीला क्षणिकतेत आनंद मिळवायला आवडतो आणि ते त्यांच्या दैनंदिन जीवनात आनंददायक अनुभव शोधतात. आकर्षक अभय वर्मा यांच्या नेतृत्वाखाली, आम्ही हे दाखवतो की मेंटोसचा आनंद घेणं कसं एक ताजी विचारसरणी निर्माण करते, ज्यामुळे व्यक्तींना नीरस क्षणांमध्येही मजा शोधायला प्रेरणा मिळते."

ओगिल्वी वेस्ट चे मॅनेजिंग पार्टनर (क्रिएटिव्ह) अनुराग अग्निहोत्री 8 वर्षांच्या विश्रांतीनंतर मेंटोसच्या पुनरागमनावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणाले, “आम्ही आमचा संदेश साधा पण प्रभावी ठेवण्याचा विचार केला. जीवनामध्ये अनेक वेळा आपल्याला अशा दैनंदिन क्षणांचा सामना करावा लागतो, जे एकसारख्या आणि नीरसतेच्या सर्किटमध्ये अडकलेले असतात. इथेच मेंटोस महत्त्वाची भूमिका निभावतो. एकच ताज्या चवीचा बाइट आणि मेंटोस त्या नीरस क्षणांना अनपेक्षित आनंदाच्या लाटांमध्ये बदलून टाकतो. परिस्थिती कितीही उदासीन असो, मेंटोस त्याला एक अविस्मरणीय आणि ताजेतवाने अनुभवात बदलतो.

# खडकवासला विधानसभा मतदारसंघात आचारसंहिता पालनासाठी निर्णायक उपाययोजना : डॉ. माने यांच्या स्पष्ट सूचना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुका 2024 शांततेत व पारदर्शकतेने पार पाडण्यासाठी खडकवासला विधानसभा मतदारसंघात निवडणूक आयोगाने आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी कडक उपाययोजना सुरु केल्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी पुणे विभागीय परिवहन कार्यालयाला व पोलिसांना आचारसंहिता भंग होऊ नये यासाठी खास सूचना दिल्या आहेत.




वाहन तपासणीवर कडक नियंत्रण: उमेदवारांच्या वाहनांमुळे आचारसंहितेचे उल्लंघन होण्याची शक्यता लक्षात घेऊन परिवहन विभागाला त्यावर विशेष लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले. या वाहनांवर कडक निरीक्षण ठेवून आचारसंहितेचे काटेकोर पालन सुनिश्चित केले जाईल.

संवेदनशील भागात पेट्रोलिंग वाढवणे: मतदारसंघातील झोपडपट्टी व गर्दीच्या भागांत पोलिसांनी नियमित पेट्रोलिंग वाढवून कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी घेतली आहे, ज्यामुळे संभाव्य तणाव टाळता येईल.

एक खिडकी कक्ष विभागाच्या नियमांचे काटेकोर पालन: एक खिडकी कक्षाद्वारे दिलेल्या परवानग्यांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी फ्लायिंग स्क्वाड टीम आणि स्टॅटिक सर्विलन्स टीमला निरीक्षणाची जबाबदारी देण्यात आली आहे.

यावेळी तहसीलदार किरण सुरवसे आणि नायब तहसीलदार सचिन आखाडे उपस्थित होते.

# मलाका आर्ट गॅलरीत समुह कला प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रोमार्टिका आर्ट डिकोडेड पुन्हा एकदा उदयोन्मुख कलाकारांच्या चित्रांच्या स्वाक्षरी गट प्रदर्शनांसह परतले आहे. मलाका आर्ट गैलरी, कोरेगाव पार्क, पुणे येथे. नोव्हेंबर महिन्यात दोन गट प्रदर्शन एकामागून एक होणार आहेत. प्रदर्शनाचा पहिला टप्पा 4 ते 15 नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आर्ट पुणे फाउंडेशनचे संचालक श्री. संजीव पवार यांच्या हस्ते झाले आहे. साईकत बक्सी यांनी क्युरेट केलेले हे प्रदर्शन भारतीय शास्त्रीय, वास्तववाद आणि अमूर्त अभिव्यक्ती यांचे मोहक मिश्रण सादर करते. कलाकार ममता प्रसाद त्यांच्या कॅनव्हासवर उत्कटतेचा स्फोट सादर करतात. त्यांच्या चित्रांमध्ये आनंद आणि दु:खाच्या तालासह भावनिक वादळाची झलक दिसते. कलाकार निलिमा गाडलिंग यांच्या काळ्या आणि पांढऱ्या पेन आणि शाईच्या चित्रांमध्ये प्रेक्षकांना झेनसारख्या अमूर्ततेकडे आकर्षित केले जाते. त्यांच्या कॅनव्हासवर कॅलिग्राफिक स्ट्रोक्स आणि नैसर्गिक लय यांचे असामान्य मिश्रण सादर केले आहे.

## थोडक्यात



### वडगाव बुद्रुकमध्ये सचिन दोडकेंची फराळ चर्चा

**पुणे (आरंभ पर्व) :** खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार सचिन दोडके यांनी पुणे मनपाच्या वडगाव बुद्रुक येथील उद्यानामध्ये नागरिकासोबत सोबत फराळ चर्चा केली. समस्त दोडके मित्र परिवाराच्या वतीने वडगाव बुद्रुक येथील उद्यानात जॉगिंग ट्रॅकवर व्यायामासाठी व मॉर्निंग वॉकसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते. यावेळी नागरिकांनी सचिन दोडके यांना पाठिंबा दर्शविला. दिवाळी फराळाच्या ठिकाणी आलेल्या शुभेच्छा स्वीकारत त्यांच्याशी दोडकेंनी संवाद साधला. नागरिकांनी देखील फराळाचा आस्वाद घेत त्यांच्या अडचणी व समस्या आदींबाबत चर्चा केली. दोडके मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास नागरिकांनी व उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



### महापुरूषांचे उत्कृष्ट प्रकारे गीत गायन

**उरूळी कांचन (आरंभ पर्व) :** इन्फिनिटी कम्युनिटी रेडिओ केंद्र आकुर्डी प्राधिकरण निगडी पुणे आयोजित रेकॉर्डिंग कार्यक्रम नुकताच पार पडला. साने संगीत जनजागृती लोककला मंच उरूळी कांचन याना कार्यक्रम मध्ये संधी मिळाली. प्रमुख उपस्थिती इन्फिनिटी रेडिओ केंद्राचे संचालक निर्मिती माधुरी ढमाले, रेकॉर्डिंग विराज सर मान्यवर उपस्थित होते.

# आबा बागुलांच्या विकास यात्रेने पर्वती दुमदुमली

## विकास पाहिजे तर आबाच पाहीजेच्या घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आबा बागुल यांची हजारो महिला व काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सहभागाने निघालेल्या विकास यात्रेने सर्व पर्वती मतदारसंघात विकास पाहिजे तर आबाच पाहीजे या घोषणांनी दुमदुमून गेला. तत्पूर्वी बागुल यांनी पर्वती पायथा येथील श्री महादेव मंदिरात जाऊन दर्शन घेत, नारळ अर्पण करीत पदयात्रेला सुरुवात केली. यावेळी हेमंत बागुल, अमित बागुल व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी पासून काँग्रेसचे निष्ठावंत असलेल्या बागुल यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला असला तरी, पर्वती विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी बागुल यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहेत.

आबा बागुल यांच्या पदयात्रेची आज सकाळी दहा वाजता अप्पर बस डेपो येथून मोठ्या दिमाखात सुरुवात झाली. यावेळी उपस्थितांनी हातात बागुल यांचे फोटो व त्यांचे निवडणूक चिन्ह असलेले 'हिरा' चे कट आउट घेऊन, आबांच्या विजयाचा जयघोष केला. आबा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ हे. हिऱ्या सारखे व्यक्तिमत्त्व असलेल्या आबांना हिरा हे निवडणूक चिन्ह मिळाले हे आबांच्या विजयाचे संकेत आहेत, पर्वतीचा विकास हा केवळ आबा बागुल करू शकतात, यावेळी आमच्या श्रावणबाळाला विधानसभेवर पाठविणारच अशा भावना अनेकांनी या पदयात्रेदरम्यान बोलून दाखविल्या.



अप्पर बस डेपो येथून सुरु झालेली ही पदयात्रा वाजत गाजत अप्पर,सुप्पर,महेश सोसायटी, इंदिरा नगर, बिबवेवाडी गावठाण, बिबवेवाडी ओटा मार्गी वाळवेकर लॉन्स येथे दुपारी दोनच्या सुमारास पोहचली. या पदयात्रेदरम्यान जागोजागी लाडक्या श्रावण बाळ आबा बागुल यांचे औक्षण करून त्यांना ओवाळून विजयाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच चौकाचौकात बागुल यांचे परिसरातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी हार, पुष्पगुच्छ देऊन बागुल यांचे स्वागत करीत त्यांना विजयी करून देण्याचा निर्धार व्यक्त केला. फटाक्यांची आतिषबाजी, बँडचा निनाद, हलगीचे वादन व बागुल यांच्या नावाचा जयघोष अशा शाही थाटात ही पदयात्रा मार्गस्थ होत होती. पदयात्रेदरम्यान रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या नागरिकांनी उस्फूर्तपणे बागुल यांच्याशी हस्तांदोलन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

पर्वती विधानसभा मतदारसंघ हा जागृत नागरिकांचा मतदार संघ असून, येथील विकास गेली पंधरा वर्षे मागे का पडला हा प्रश्न सर्वच नागरिकांच्या मनात आहे. त्यामुळे हा मागे पडलेला विकास भरून काढण्यासाठी अधिक वेगाने व जिद्दीने काम करण्याची गरज आहे. त्यासाठी पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासासाठी मी ही निवडणूक लढवत असून, भविष्यातील सुखदायी व आनंद देणारा पर्यावरणवादी मतदारसंघ करण्याचा माझा संकल्प आहे. त्यास नागरिकांनी पाठींबा द्यावा, असे आवाहन आबा बागुल यांनी पदयात्रेच्या शेवटच्या टप्प्यात भाषण करताना केले.

पदयात्रेत पर्वती मतदारसंघातील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये जयकुमार ठोंबरे, नीता नेटके, बेबी राऊत, सुनीता नेमुर, राजिया बिलारी, इंगवले ताई, महाराणा प्रताप मंडळ, अखिल अप्पर मित्र मंडळ, दुर्गा माता नवरात्री उत्सव, पंचशील मित्र मंडळ, निळं वादळ ग्रुप आदीसह शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी होते.

# पर्वतीमध्ये "आबा" पॅटर्नची जोरदार चर्चा

## आबा बागुल यांच्यासाठी कुटुंबासहित कार्यकर्त्यांची तळमळ





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत होत आहे. या लढतीची ही सर्वत्र चर्चा होत आहे. भाजपच्या आमदार माधुरी मिसाळ त्यांच्याविरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाच्या अश्विनी कदम व अपक्ष उमेदवार आबा बागुल यांच्यामध्ये प्रामुख्याने सामना होतो आहे. आपली राजकीय कारकीर्द काँग्रेसमध्ये घालवणारे आबा बागुल सध्या विधानसभा निवडणुक अपक्ष लढवत आहेत. मात्र आजही त्यांच्यासोबत असलेला तिरंगी उपरणे हे काँग्रेस विषयी असलेले प्रेम दर्शवत आहे. यावरून आबांच्या मनात रुतलेली काँग्रेस आजही कायम असल्याचे सिद्ध होत आहे. मात्र विधानसभेसाठी त्यांनी अपक्ष उमेदवार दाखल करूनही शर्तीचे प्रयत्न केले आहेत. आबा बागुल यांच्या पद यात्रेतील कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता पर्वती विधानसभेमध्ये परिवर्तनाचे संकेत देत आहेत. त्यामुळे तिरंगी होणाऱ्या या लढतीत "सांगली पॅटर्नची" ही चर्चा जोरात होत आहे. आबा बागुल यांच्यामुळे पर्वती मध्ये कडवे आव्हान उभे राहिले आहे.बागुल यांच्या प्रचाराची धुरा त्यांचे सुपुत्र हेमंत, अमित, पत्नी जयश्री ताई बागुल व अनेक कार्यकर्त्यांच्या सोबतीने त्यांचा उत्साहात प्रचार सुरू आहे. आबा बागुल यांनी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून केलेले आदर्श कार्य पाहता पर्वतीचा सर्वांगीण विकास करण्याचं ध्येय आबा बागुल यांच्या मध्येच आहे असे दिसून येते. त्यामुळे मतदारांच्या आशा वाढलेल्या आहेत. हिरवी काँग्रेसचा हात घेऊन लढणारे आबा यावेळी "हिरा" चिन्ह घेऊन निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे काही अदृश्य शक्तीचीही त्यांना साथ मिळण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. त्यामुळे बागुल यांच्या विधानसभा निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागणार आहे.

## पर्वतीच्या विकासाची चाहुल विकासरत्न आबा बागुल!!!

### आबांचा सन्मान राखायला हवा होता : कार्यकर्त्यांची खंत

काँग्रेसचे नेते आबा बागुल हे पर्वती विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी घेऊन निवडणूक लढवत आहेत. महाविकासाकडे मध्ये हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारला गेल्यामुळे बागुल यांना अपक्ष लढण्याची नामुष्की ओढावली. मात्र कार्यकर्त्यांनी प्रचंड आग्रह केल्यामुळे आबा बागुल हे विधानसभेच्या आखाड्यात पूर्ण ताकदीने उतरले आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला कार्यकर्त्यांनी खंत बोलून दाखवली. पर्वती विधानसभा मतदारसंघांमध्ये गेली तीस वर्षाहून अधिक काळ आबा बागुल हे सामाजिक व राजकीय कार्यात अग्रेसर आहेत. त्यांचे वय व त्यांची कारकीर्द पाहता त्यांना आमदारकी पूर्वीच मिळाला हवी होती. पक्षाकडून सातत्याने त्यांना डावलण्यात आल्याचे दिसून येते. या वयाचा या तोडीचा या मतदारसंघांमध्ये कोणताही नेता नाही. अशावेळी त्यांच्या कारकिर्दीचा सन्मान म्हणून त्यांना आमदारकी द्यायला हवी असा सूर बागुल यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उमटतो आहे. काँग्रेस पक्षाकडून जरी संधी मिळाली नसली तरीही जनता हाच पक्ष समजून पर्वती विधानसभेत मोठ्या मताधिक्यांनी आबा बागुल विजय होतील असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### भाजप नेत्यांनी तोंड सांभाळून बोलावे, अन्यथा फिरणे मुश्किल करू



- रोहन सुरवसे-पाटील यांचा इशारा
- पवार यांच्यावरील सदाभाऊ खोतांच्या वादग्रस्त वक्तव्यावर युवक काँग्रेस आक्रमक

**पुणे (आरंभ पर्व)** : सांगलीतील जत येथे महायुतीच्या प्रचार सभेत भाजप नेते व आमदार सदाभाऊ खोत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर पातळी सोडून टीका केल्यानंतर राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. आमदार सदाभाऊ खोत यांचा महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून व कार्यकर्त्यांकडून तीव्र निषेध केला जात आहे. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसनेही आक्रमक भूमिका घेत भाजप नेत्यांनी तोंड सांभाळून बोलावे, अन्यथा फिरणे मुश्किल करू, असा थेट इशाराच दिला आहे.

युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील म्हणाले, "भाजपच्या नेत्यांनी इतर पक्षातील नेत्यांबाबत बोलताना तोंड सांभाळून आणि भान ठेवून बोलले पाहिजे. सदाभाऊ खोत यांना सत्तेची मस्ती चढली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा एकेरी उल्लेख करत खोत यांनी पातळी सोडून केलेली टीका महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला धरून नाही.

### खेड-आळंदी विधानसभा खर्च तपासणी वेळापत्रक जाहीर

**राजगुरुनगर (आरंभ पर्व) :** भारत निर्वाचन आयोगाच्या सूचनेनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी 197 खेड आळंदी विधानसभा मतदार विधानसंघातील सर्व उमेदवारांच्या निवडणूक विषयाच्या खर्चाची तपासणी खर्च निरीक्षक 197 खेड आळंदी विधानसभा मतदार संघ यांचेकडून राजगुरुनगर तहसीलदार कार्यालयामध्ये होणार आहे. प्रथम खर्च तपासणी 9 नोव्हेंबरला, द्वितीय 13 नोव्हेंबरला आणि तृतीय खर्च तपासणी 17 नोव्हेंबरला सकाळी 10 ते 5 या वेळात करण्यात येणार आहे. तरी सर्व उमेदवारांनी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे तपासणीसाठी दैनंदीन हिशोबांची नोंदवही व त्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांसह उमेदवारांनी स्वतः किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी तपासणीसाठी उपस्थित राहावे. अन्यथा भारत निर्वाचन आयोगाच्या सूचनेनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन 197 खेड - आळंदी विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी केले आहे.

*जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे दिवाळीनिमित्त पंतप्रधान आणि सैनिकांप्रती कृतज्ञता*

## 2 हजार विद्यार्थ्यांचे पंतप्रधान आणि सैनिकांना पत्र



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमधील 2 हजार विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैनिकांना पत्र लिहिली. दिवाळीनिमित्त ही पत्रे नरेंद्र मोदी आणि जम्मू काश्मिर येथे तैनात बीएसएफ जवानांना पाठवण्यात आली. जवानांना दिवाळीच्या शुभेच्छा देत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून विद्यार्थ्यांनी पत्रातून जवानांना अभिवादन केले आहे. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी याकरिता विशेष मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या मनातील सैनिकांबद्दल आदर या उपक्रमाद्वारे दिसून आला. भारतीय सेनेबद्दल सर्वसामान्यांमध्ये जागृती करण्याचे काम शिक्षकांच्या माध्यमातून करण्यात आले. भारतीय सैन्याविषयी आणि सैनिकांच्या बलिदानाविषयी माहिती यावेळी देण्यात आली. तुम्ही सीमेवर आहात, म्हणून आम्ही देशात सुरक्षित आहोत. तुम्ही आमची ताकद आहात. आम्हाला ही मोठे झाल्यावर तुमच्यासारखे सैनिक व्हायचे असे लिहीत विद्यार्थ्यांनी सैनिकांप्रती आपला आदर व्यक्त केला. पंतप्रधानांनी पुढाकाराने आधुनिक आणि विकसित भारताच्या गरजा लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक लागू करण्यात आले आहे. ज्ञानाच्या बाबतीत भारताला एक मजबूत देश बनवण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत, अशी ग्वाही मुलांनी पत्राद्वारे दिली. तसेच नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकास आणि नोकरी धिष्ठित शिक्षण असावे, अशी अपेक्षा देखील व्यक्त केली.

## आघाडीचे सुफी गायक बिस्मिलची आता भारतात टूर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बिस्मिल हे दिल्लीतील प्रसिध्द गायक, गीतकार, कलाकार आणि संगितकार आहेत. सुफी संगीताच्या बैठकीं मुळे ते खूपच प्रसिध्द झाले, त्याच बरोबर त्यांच्या संकल्पनेतून त्यांचे मॅनेजर विभोर हसिजा यांनी युवर्स इव्हेंटफूल ही अनोखी संकल्पना सुरु केली आहे. या जोडीने सुफी संगीताला नवीन आयाम देऊन परंपरागत जोडणी सुफी संगीताला दिली आहे. बिस्मिल यांच्या या दौऱ्याचा हा टप्पा हा 10 नोव्हेंबर रोजी पुणे येथे येणार असून या दौऱ्याचे कार्यक्रम हे भारतातील 18 शहरांत आयोजित करण्यात येणार आहेत.बि स्मिल की महफिल हा त्यांचा सिग्नेचर इव्हेंट असून या कार्यक्रमाचे भारतात तीन अगदी यशस्वी असे दौरे झाले आहेत, यामध्ये प्रत्येक कार्यक्रमाला 2 लाखांहून अधिक लोकांनी भेट दिली आणि डिजिटल मंचावर 100 दशलक्षांहून अधिक व्ह्यूज मिळवले आहेत. त्यांच्या कुशलते सह नाविन्यपूर्ण दृष्टिकोना मुळे त्यांनी यूएस आणि कॅनडा मध्ये दोन यशस्वी दौरे केले असून यातील एक कार्यक्रम हा टाईम्स स्क्वेअर येथे झाला, हे त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील वाढत्या लोकप्रियेतेचे प्रतीक आहे.

## प्रतिक गंगणे यांना 'हिंदु रत्न' पुरस्कार प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारत सरकारच्या निती आयोगाशी संलग्नित असणाऱ्या डॉ. मणिभाई देसाई मानव सेवा ट्रस्टच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय एकात्मता दिन' व समाजातील विविध स्तरावर कार्यरत असलेल्या मान्यवरांना सरदार वल्लभभाई पटेल हिंदू राष्ट्र रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन डॉ मणिभाई देसाई मानव सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ प्रवचनकार हभप समाजसेवक डॉ रवींद्र भोळे यांनी केले होते. पुण्यातील संपादक, पत्रकार तसेच युवा उद्योजक प्रतिक गंगणे यांना या कार्यक्रमात 'हिंदु रत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रतिक गंगणे म्हणाले, पत्रकारीतेचे बाळकडू घरातूनच मिळाले असून पत्रकारीता कशी करावी हे वडिलांनी शिकवले. माझ्या या पुरस्काचे सर्व श्रेय माझ्या वडिलांना जाते. हा कार्यक्रम ज्ञानवती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह लोहिया नगर पुणे येथे संपन्न झाला.

## 19 वर्षाची साक्षी पुण्यातून 5 महिने बेपत्ता

### शिवाभाऊ पासलकर यांचे मदतीचे आवाहन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातून पुरुष, महिला तसेच लहान मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक वाढत आहेत. अशातच साक्षी प्रताप ढोळे (वय-19 वर्ष) ही मुलगी 5 जून 2024 (म्हणजेच तब्बल 5 महिने) रोजी पुण्याच्या राहत्या घरातून (संतोषनगर, कात्रज) निघून गेली आहे.

यासंदर्भात पत्रकार परिषद घेत महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे शिवाभाऊ पासलकर यांनी मुलीचा शोध घेण्यासाठी मदतीचे आवाहन केले आहे.

पत्रकार परिषदेत साक्षीची आई भावूक होऊन म्हणाली, दिवाळी, दसरा सारखे अनेक सण गेले पण माझी साक्षी सोबत नसल्याने मला अतिशय दुःख होत आहे.

एक मुलगी घरातून निघून जाते त्यावेळी जो मानसिक त्रास होतो तो फक्त त्या आईलाच माहिती असतो. साक्षी कुठेही असेल तिथून तिने निघून यावे अशी भावनिक साद यावेळी त्यांनी घातली.

महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे शिवाभाऊ पासलकर म्हणाले, 19 वर्षाची मुलगी जेव्हा बेपत्ता होते त्यावेळेस त्या मातेस काय वेदना होत असतील हे आपण समजू शकतो.

आज ती मुलगी काय करत असेल, कशी असेल, कुठे राहत असेल, संकटात असेल का अशा अनेक प्रश्नांनी साक्षीची आई चिंतेत आहे. सर्वांनी प्रयत्न करुन त्या मुलीला शोधून आपण एक चांगले कार्य करू शकतो त्यामुळे सर्वांनी ही माहिती सर्वत्र पोहचवत साक्षीला शोधण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन शिवाभाऊ पासलकर यांनी केले.

# विकास कामांमुळे विजय निश्चित, 110 गावात मिळेल मोठी आघाडी

- आ.राऊत यांना विजयाचा आत्मविश्वास
- प्रचंड उत्साह, उस्फूर्त जल्लोष, ढोल ताशांच्या गजरात आमदार राजाभाऊ राऊत यांचा कार्यकर्त्यांकडून जयजयकार
- कार्यकर्त्यांच्या भरगच्च गर्दीत विजय संकल्प मेळावा संपन्न




**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

स्थळ माऊली लॉन्स, वेळ दुपारी एक ची, सभागृहात, आणि सभागृहाच्या बाहेरही बार्शी तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची भरगच्च गर्दी. अठरा वर्षाच्या युवकापासून साठी ओलांडलेले जेष्ठ नागरिक सुद्धा उत्साहाने आलेले. हे दृश्य होते 246 बार्शी विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार राजेंद्र राऊत यांच्या विजय संकल्प मेळाव्यातील. आमदार राजाभाऊ राऊत यांचे कार्यक्रम स्थळी आगमन झाले आणि कार्यकर्त्यांनी प्रचंड उत्साहाने "राजभाऊ राऊत आगे बढोच्या" घोषणा दिल्या. टाळ्यांचा गजर झाला. छत्रपती शिवराय आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन झाले.

आमदार राजाभाऊ राऊत यांनी कार्यकर्त्यांना, "फक्त तुमच्याशी संवाद साधणार आहे, शेतकऱ्यांचे सोयाबीन काढणी, पेरणीचे दिवस आहेत, पण तरीही माझ्यावरच्या प्रेमापोटी आलात याबद्दल आभारी आहे ,"असे म्हणत ,"तुमची कोणतीही अडचण असेल तर थेट माझ्याशी संपर्क साधा", असे आवाहन केले. "तालुक्यातील प्रत्येक गावात गेल्यानंतर केलेली विकास कामे दिसतात आणि त्यामुळे जनतेचे प्रेमही जाणवते, पण अजिबात गाफील राहू नका, ज्याप्रमाणे नगरपालिका आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये दररोज प्रचारासाठी घरोघर फिरतो त्याप्रमाणे आपापल्या प्रभागात आणि सतत लोकांपर्यंत जावा, आणि आपली विकास कामे सांगा, महिलांना आणि सर्व जाती-धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन आपण तीस वर्ष लोकसेवेचे राजकारण करतोय आणि यापुढेही करत राहणार, त्यामुळे आपण केलेल्या सर्वेक्षणानुसार तालुक्यातील 110 पेक्षा जास्त गावात मतांची विजयी आघाडी निश्चित आहे. आपापल्या गावातले, बाहेर गावचे नातेवाईक, मित्र यांना संपर्कात राहून मतदानाला आणा. तसेच महिलांचाही आदर सन्मान ठेवा. हा लाडका भाऊ या लाडक्या बहिणींच्या पाठीशी कायम राहणार आहे असे अभिवचन आमदार राऊत यांनी दिले.

यावेळी आमदार राऊत यांनी आजपर्यंत बार्शी तालुका हेच माझे कुटुंब आहे असे समजून वागलो आहे, यापुढेही माझ्या मनात जनतेचे कुटुंबीय हेच स्थान राहील असे आमदार राऊत यांनी सांगितले.

यावेळी आमदार राऊत यांनी मुख्यमंत्र्यांसहित, रिपब्लिकन नेते खासदार रामदास आठवले यांच्यासह प्रमुख नेत्यांच्या बार्शी तालुक्यात सभा होणार आहेत. पुढचे पंधरा दिवस महत्त्वाचे आहेत. सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाने, एकोप्याने, कामाला लागावे, प्रत्येक झटलेल्या कार्यकर्त्याला आजपर्यंत न्याय दिला आहे, यापुढेही सर्वांना त्यांच्या कामाला वाव देण्याची संधी मिळेल. तसेच विरोधकांची आरोपांची पातळी घसरली तर त्यांना त्याच प्रमाणे उत्तर मिळेल असे आमदार राऊत यांनी सांगितले.

यावेळी बाजार समितीचे प्रशासक विजय नाना राऊत, बाजार समितीचे माजी सभापती रणवीर भैय्या राऊत, वैराग चे ज्येष्ठ नेते संतोष निंबाळकर, पंचायत समितीचे माजी सभापती अनिल काका डिसले, माजी नगराध्यक्ष आसिफ भाई तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश अण्णा पाटील, माजी नगरसेवक विलास रेणके, बाजार समितीचे माजी संचालक रावसाहेब मनगिरे, माजी उपसभापती केशव घोगरे, माजी उपसभापती झुंबर आण्णा जाधव, सर्व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य, पंचायत समिती माजी सदस्य, माजी नगरसेवक, आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धायरी व भागातून महाविकास आघाडीला मताधिक्य निश्चित मिळणार

## नेते व कार्यकर्त्यांचा निर्धार

## सचिन दोडके यांची धायरीत पदयात्रा व भेटीगाठी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार सचिन दोडके यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार मोहीम सुरू केली आहे. त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाचा भाग असलेल्या धायरीमध्ये ही सचिन दोडके यांनी प्रचार म्हणून सुरू केली आहे.नुकतेच धायरी भागामध्ये सचिन दोडके यांनी पदयात्रा व



नागरिकांच्या भेटीसाठी घेतल्या. यावेळी धायरीकर ग्रामस्थांनी आपुलकीने केलेल्या सन्मानाचा दोडके यांनी स्वीकार केला. तसेच गावातील ग्रामदैवत धारेश्वर मंदिर, काळभैरवनाथ



मंदिर दर्शन घेऊन ह्या प्रचार मोहिमेस सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, काँग्रेसचे श्रीरंग चव्हाण, शिवसेनेचे नितीन वाघ, तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला व मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोडके यांनी नागरिकांशी विविध विषयांवर संवाद साधला. नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच त्यांना आलेल्या समस्या तत्काळ सोडवण्यासाठी कटिबध्द असल्याचा शब्द त्यांना दिला. परिसरात अधिकाधिक लोकहिताचं काम करता यावं यासाठी येत्या 20 तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या

### सर्वांगीण विकासाची अपेक्षा

यावेळी बोलताना अनेक नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी धायरी येथील समस्या मांडल्या. अनेक रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये असूनही मूलभूत सुविधांची वाणवा अपुरा पाणीपुरवठा , भयंकर वाहतूक कोंडी या ठिकाणी होत आहे. आगामी काळात दोडके यांच्याकडून धायरीच्या सर्वांगीण विकासाची अपेक्षा नागरिकांनी केली आहे.

चिन्हाच्या समोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचं आवाहन दोडके यांनी केलं. खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, शिवसेनेचे नितीन वाघ यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या विजयासाठी एकत्रितपणे काम करून दोडके यांच्या विजयासाठी प्रयत्न करूयात व महाविकास आघाडीचा आमदार बनवूया असे सांगितले. ह्या भागातून मतदार निश्चितपणे मोठे मताधिक्य देऊन खडकवासला जिंकून दाखवूया असा निर्धार कार्यकर्त्यांनी बोलून दाखवला आहे.

## थोडक्यात

Utkarsh Small Finance Bank
Aapki Ummeed Ka Khaata

### उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचा पहिला शाश्वत अहवाल सादर

**मुंबई (आरंभ पर्व) :** "यू-सस्टेन" नावाचा सर्वसमावेशक अहवाल, शाश्वत विकास आणि जबाबदार बँकिंगला चालना देण्यासाठी बँकेच्या धोरणात्मक पुढाकार आणि उपलब्धींवर प्रकाश टाकतो. उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडने अभिमानाने आर्थिक वर्ष 2023-24 साठीचा शाश्वत-क्षमता अहवाल जाहीर केला आहे, जो बँकेच्या पर्यावरण-मानसिक, सामाजिक, आणि प्रशासन तत्त्वांना गाभ्यामध्ये समाकलित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड आहे. ऑपरेशन्स "यू-सस्टेन" नावाचा हा सर्वसमावेशक अहवाल, शाश्वत विकास आणि जबाबदार बँकिंगला चालना देण्यासाठी बँकेच्या धोरणात्मक पुढाकार आणि यशांवर प्रकाश टाकतो. शाश्वतता अहवालाची प्रमुख वैशिष्ट्ये : ईएसजी धोरण बँकेच्या ईएसजी धोरण, हवामान जोखीम व्यवस्थापन आणि शाश्वत संसाधने वापराविषयी तपशीलवार अंतर्दृष्टी. ऊर्जा कार्यक्षमता, कचरा व्यवस्थापन आणि हरित तंत्रज्ञानाचा अवलंब यातील यश. सामाजिक प्रभाव: आर्थिक समावेशन, समुदाय प्रतिबद्धता आणि कर्मचारी विविधता आणि विकासासाठी प्रयत्न. शासन: पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नैतिक व्यवसाय पद्धती सुनिश्चित करणारी मजबूत प्रशासन फ्रेमवर्क.



शंकर भाऊ बांदल
सुरेंद्र सिंग भाटी
किल्ले सिंहगड 2024
किल्याचा साईज उंची 5 फूट
रुंदी 10 फूट लांबी 8 फूट
प्रमुख आकर्षण दूरदर्शन टॉवर,मोबाईल टॉवर, राजाराम महाराज समाधी, सुभेदार तानाजी मालुसरे स्मारक, देव टाके, पुणे दरवाजा, कल्ल्याण दरवाजा, कोंढाणेश्वर मंदिर*

पत्ता सुजाता रेसिडेन्सी शिवणे दांगट पाटील नगर युनिट मेडिकल समोर





## जितो पुणे बी टू बी विभागातर्फे संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

आजची सामाजिक व्यवस्था ही धार्मिक सिद्धांतानुसार घडली पाहिजे. समाजाचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे. सर्वांचा आर्थिक-सामाजिक स्तर एक झाला पाहिजे. शेअर मार्केट, म्युच्युअल फंडच्या माध्यमातून उत्पन्नात वाढ झाली आहे; पण माणसाचे मन खुश आहे का याचाही विचार होणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत शुद्ध सामाजिक व्यवस्थेच्या माध्यमातून समाजाचे उत्थान होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रिझर्व बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर पद्मभूषण डी. आर. मेहता यांनी केले. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या (जितो) पुणे विभागातर्फे आर्थिक सक्षमीकरणासंदर्भात आज (दि. 6) सरहद पब्लिक स्कूल, धनकवडी येथे संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मेहता बोलत होते. जितोच्या कार्यांचे कौतुक करून मेहता पुढे म्हणाले, भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्याने येथे आंतरराष्ट्रीय पातळीवरही आर्थिक क्षेत्रात मोठ्याप्रमाणात सकारात्मक बदल घडले आहे.

# खडकवासला मतदारसंघाच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवून राजकारण करतोय : आ. भीमराव तापकीर

## सोनपूर येथे गावभेट व मतदारांशी आ. तापकीर यांचा संवाद



सोनपूर गावात आ. तापकीर यांच्या पाठपुराव्यातून पानशेत रस्ता 9/000 ते 9/500 मध्ये स्लॅब ड्रेन संरक्षक भिंत बांधकाम, सोनापूर जोडा रस्ता, महादेव मंदिर परिसरात संरक्षक भिंत बांधकाम, स्मशानभूमी परिसरात सुशोभीकरण व संरक्षक भिंत बांधकाम, जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा सोय, महावितरण सुधारणा विषयक कामे अशी कामे झाली आहेत.मोठ्या प्रमाणावर निधी दिल्याबद्दल ग्रामस्थांनी आ. भीमराव तापकिर यांचे आभार मानले. व आगामी विधानसभेतही त्यांना सहकार्य करणार असल्याचे यावेळी सांगितले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेली तीन टर्म आपण विकासाचे उद्दिष्ट ठेवून राजकारण करतोय आगामी काळात त्याचं उद्दिष्टाने काम करून खडकवासला मतदारसंघात जास्तीत जास्त विकास कामे करण्याचा प्रयत्न करतोय अशी भावना भारतीय जनता पार्टी महायूतीचे उमेदवार आ.भीमराव तापकीर यांनी सोंनपुर येथे व्यक्त केले. खडकवासला मतदारसंघातील सोनपूर गावात निवडणुकीच्या प्रचारार्थ आ.तापकिर यांनी भेट दिली. व ग्रामस्थांशी संवाद साधला. आजवर कितीतरी निवडणूक लढवल्या मात्र टीका, सहानभूती, खोटा प्रचार, इतर मुद्द्यावर कधीच निवडणूक लढवली नाही कारण जनतेला विकास महत्त्वाचा आहे. मतदारसंघात भविष्यातही विकास कामे करण्यावर माझा भर आहे. आगामी काळातही पुन्हा महायुतीचे सरकार निश्चित येईल. गेल्या 13 वर्षात सोनपुर गावासाठी विविध विकासकामे केली आहेत . येणाऱ्या निवडणुकीत भाजप-महायुतीला भरघोस मतदान करावे अशी विनंती ही आ.तापकीर यांनी नागरिकांना केली. या गावभेटी प्रसंगी माजी उपमहापौर दिलीप बराटे, भाजपा खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे तसेच भाजप-महायुती मित्रपक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातारा रस्त्यावरील वाहतुक कोंडी सोडवणार

## पर्वती टँकरमुक्त करणार : आबा बागुलांची ग्वाही

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आबा बागुल यांनी गुरुवारी घरोघरी जाऊन नागरिकांची भेट घेत त्यांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. यावेळी त्यांनी सातारा रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कटीबद्ध असल्याचे सांगून, स्वारगेट ते कात्रज हा मेट्रो मार्ग शीघ्रगतीने मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले.

हिरा हे निवडणूक चिन्ह असलेल्या आबा बागुल यांनी आज नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटीगाठी वर भर दिला. यावेळी त्यांनी पर्वती मतदार संघ टँकर मुक्त करून सर्वांना वेळेवर पाणी देण्यासाठी मी



प्रयत्न करणार आहे. विजयी झाल्यावर हा परिसर टँकर माफियामुक्त होईल असा विश्वास त्यांनी नागरिकांना दिला.

नेहमी नागरिकांच्या संपर्कात असलेल्या आबा बागुल यांची आज संदेश नगर येथील विद्यासागर सोसायटीच्या रहिवाश्यांनी भेट घेऊन येथील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावे अशी विनंती केली. यावेळी आबा यांनी हा प्रश्न तातडीने सोडविला जाईल असे सांगितले. दरम्यान पर्वती मतदार संघातील कोणतेही प्रश्न असतील ते मला सांगा, तसेच आपल्या भागातील विकासाबाबत काही कल्पना असतील, अडचणी असतील त्या वाळवेकर लॉन्स येथील जनसंपर्क कार्यालयात आणून द्यव्यात, त्याचे निराकरण निवडून आल्यावर केले जाईल असे आवाहन आबा बागुल यांनी नागरिकांना केले.

पर्वती मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आबा बागुल हे गेली 32 वर्षे महापालिकेत अपराजित नगरसेवक आहेत. आपल्या प्रभागातील मूलभूत समस्यांचे निवारण त्यांनी केले आहे. याचबरोबर संपूर्ण राज्याला नव्हे तर देशाला हेवा वाटेल असे राजीव गांधी ई-लर्निंग स्कुल, भारतरत्न भिमसेन जोशी कलादालन, 1971 च्या युद्धावर आधारित म्युझिकल कारंजे व लेझर शो प्रकल्प यशस्वीरित्या राबविले आहेत.

# खलिल शेख यांना 'आदर्श सर्पमित्र' पुरस्कार प्रदान

## डॉ. रवींद्र भोळे यांच्या हस्ते सन्मान

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

भारत सरकारच्या निती आयोगाशी संलग्नित असणाऱ्या डॉ मणिभाई देसाई मानव सेवा ट्रस्टच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय एकात्मता दिन' व समाजातील विविध स्तरावर कार्यरत असलेल्या मान्यवरांना सरदार वल्लभभाई पटेल हिंदू राष्ट्र रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन डॉ मणिभाई देसाई मानव सेवा ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ प्रवचनकार हभप समाजसेवक डॉ रवींद्र भोळे यांनी केले होते. उरुळी कांचन परिसरातील सर्पमित्र खलिल शेख



यांना या कार्यक्रम मध्ये 'सर्पमित्र' पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. आम्ही सर्पमित्र निस्वार्थी भावनेने सापांना वाचविण्याचे काम करत आहोत. गेली विस वर्षापासून करत असलेल्या कार्याची दखल घेऊन जो सन्मान करण्यात आला यामुळे भविष्यात अधिकच चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळते असे मत खलिल शेख यांनी व्यक्त केले.

# तुकाईदेवीच्या साक्षीने कोंढणपुरात आ .भीमराव तापकीर यांच्या प्रचाराचा दिमाखात शुभारंभ

- आ. तापकीर चौकार मारणारच : महायुतीच्या नेत्यांना आत्मविश्वास
- प्रचार मोहिमेस कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघात भाजपा-महायुतीचे उमेदवार आमदार भिमराव अण्णा तापकीर यांच्या प्रचार व पदयात्रेची उत्साहपूर्ण सुरुवात आज शिवगंगा खोऱ्यातील श्री तुकाई देवी मंदिर, कोंढणपूर येथे श्रीफळ वाढवून



करण्यात आली. या प्रसंगी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांचा अतिशय उदंड प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे या कार्यक्रमाचा भव्य उत्सव अधिकच गगनाला भिडला.



यावेळी महायुतीतील नेते माजी नगरसेवक दिलीप बराटे, शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश कोंडे, खडकवासला शिवसेना अध्यक्ष सतीश घाटे, माजी नगरसेवक प्रदीप (बाबा) धुमाळ, राजाभाऊ लायगुडे, हरिदास चरवड, बाळासाहेब नवले, राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला अध्यक्ष राजेंद्र पवार, भाजपा पुणे शहर उपाध्यक्ष अरूण राजवाडे, खडकवासला भाजपा अध्यक्ष सचिन मोरे, माजी नगरसेविका वर्षा तापकीर, राजश्री नवले, राणी भोसले, अश्विनी भागवत, माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री भुमकर, पंचायत समिती सदस्य अनिरुद्ध यादव यांसह महायुतीचे वरिष्ठ पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. आमदार भिमराव अण्णा तापकीर यांनी खडकवासला मतदारसंघातील ग्रामीण भागातून प्रचाराची सुरुवात करून ग्रामीण मतदारांचा चौथ्यांदा विश्वास संपादन करण्याचे उद्दिष्ट ठेऊन नागरिकांना महायुतीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

मागील निवडणुकीत ग्रामीण भागातून मिळालेल्या लीडमुळे त्यांचा आत्मविश्वास अधिक दुणावला असून, गेल्या 13 वर्षांत केलेल्या विकास कामांच्या जोरावर मतदार यावेळीही महायुतीला मतदान देऊन चौथ्यांदा विधानसभेत येतील आता असा आत्मविश्वास भीमराव तापकीर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे. महायुतीच्या सर्व नेत्यांनी बोलताना आ. भीमराव तापकीर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत मोठ्या मताधिक्यासाठी नक्की प्रयत्न करणार असल्याची भावना व्यक्त केली. आमदार तापकीर यांनी सांगितले की, "भाजपा-शिवसेना आणि महायुतीच्या सरकारने राज्याच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण कामे केली आहेत." कोंढणपूर, कल्याण, सिंहगड, रहाटवडे, आर्वी, शिवापुर, खेड शिवापुर, श्रीराम नगर, गौडदरा, गोगलवाडी यांसारख्या गावांना भेट देऊन त्यांनी मतदारांशी थेट संवाद साधला आणि आगामी निवडणुकीत महायुतीला पुन्हा एकदा विजयी करण्यासाठी जनतेला आवाहन केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.